# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.-रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र. २९/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २ जून, २०२२

निवडणूक प्राथम्य

प्रति,
आयुक्त,
बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली,
उल्हासनगर,वसई-विरार, पुणे, पिंपरी-चिंचवड,
सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, अकोला, अमरावती
व नागपूर महानगरपालिका

विषय :- १४ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२२
मतदार यादी तयार करण्याबाबतचे आदेश.

संदर्भ:- १) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.१७/का.५,
दि. ३ फेब्रुवारी, २०२२.
२) राज्य निवडणूक आयोगाची क्र.रानिआ /ग्रांप-२०२२/प्र.क्र. ०४ /का.८,
दि. ०२/०६/२०२२ ची मतदार यादी ग्राह्य धरण्याच्या दिनांकाबाबतची अधिसूचना.

महोदय,

नवी मुंबई, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, कोल्हापूर या महानगरपालिकांची मुदत अनुक्रमे मे, २०२०, जून, २०२० व नोव्हेंबर, २०२० रोजी संपलेली असून ठाणे, उल्हासनगर, नाशिक, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, अमरावती, अकोला, नागपूर व बृहन्मुंबई महानगरपालिकांची मुदत माहे मार्च-एप्रिल २०२२ मध्ये संपली आहे. त्या अनुषंगाने त्यांची सार्वत्रिक निवडणूक घेणे क्रमप्राप्त आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रामुख्याने ३ टप्पे असतात :-

(i) प्रभाग रचना व आरक्षण ठरविणे.

(ii) भारत निवडणूक आयोगाने विधानसभानिहाय तयार केलेल्या मतदार यादीचे Cut-off date रोजी प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय विभाजन

(iii) प्रत्यक्ष निवडणूक

३.	उपरोक्त १४ महानगरपालिकांची प्रभाग रचना पूर्ण झाली असून आता कायद्यातील तरतुदीनुसार मतदार यादीचा कार्यक्रम देणे आवश्यक आहे.

४.	जुलै ते ऑक्टोबर, २०२२ मध्ये होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधीन अधिसूचनेन्वये दि. ३१/०५/२०२२ ही Cut-off date जाहीर केली असून, त्या दिवशी (म्हणजेच दि. ३१/०५/२०२२ रोजी) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी सार्वत्रिक निवडणुकीसाठी वापरण्यात येईल.

५.	या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याकरीता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

१.	**मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती** - दिनांक ०१/०१/२०२२ हा अर्हता दिनांक धरुन भारत निवडणूक आयोगाकडून दिनांक ३१/५/२०२२ पर्यंत अद्ययावत केलेली विधानसभेची मतदार यादी उपरोक्त १४ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता वापरण्यात येईल.

उपरोक्त निवडणुकांकरिता भारत निवडणूक आयोगाने दि. ५/१/२०२२ पर्यंत प्रसिध्द केलेल्या मतदार यादीच्या आधारे प्रारुप प्रभाग रचनेनुसार मतदारांचे विभाजन करण्याची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन क्र. १ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने दि. १३ मे, २०२२ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द केली आहे. तरी त्यामध्ये झालेल्या बदलानुसार मतदार यादी विभाजन सुधारण्यात यावे. दि. ५ जानेवारी, २०२२ ते ३१ मे, २०२२ पर्यंत विधानसभेच्या मतदार यादीमध्ये समाविष्ट झालेल्या / वगळलेल्या / दुरुस्त्या इ. विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी विभाजनाचे काम करणे आवश्यक आहे. या कार्यालयाच्या क्र.रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.५३/का-५ च्या पत्रासोबतचे संगणकीकरण कक्षाचे दि.२६/१०/२०१७ च्या आदेशातील सूचनांनुसार कार्यवाही करावी.

२.	वरील मतदार यादी ग्राह्य धरुन उपरोक्त महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी

मतदार यादीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील :-

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : | दि. १७/०६/२०२२ |
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : | दि. १७/०६/२०२२ ते दि. २५/०६/२०२२ |
| (iii) | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या प्रसिध्द करणे | : | दि. ०७/०७/२०२२ |

३. **प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-**

३.१ महानगरपालिका आयुक्त यांनी विधानसभेच्या मतदार याद्यांचे विभाजन राज्य निवडणूक आयोगाने महाऑनलाईनच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिलेल्या संगणक प्रणालीमार्फत करणे आवश्यक आहे. याकरिता योग्य सूचना सोबतच्या सहपत्र-१ मध्ये जोडल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक टप्प्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

३.२ **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-**

अ) विधानसभा मतदार यादीत महानगरपालिकांच्या संबंधित प्रभागाच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे याची खातरजमा करण्यात यावी.

ब) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.६/का५, दि.२४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी. तसेच दुबार नावांसमोर विधानसभा निवडणुकांप्रमाणे विशिष्ट चिन्हे करुन अशा मतदारांच्या ओळखीचे पुरावे काटोकोरपणे तपासावेत.

क) मयत अथवा स्थलांतरित मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्र.-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का.५, दि.११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ड) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इत्यादीबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश)

इ) महाऑनलाईनतर्फे तयार केलेल्या आज्ञावलीच्या मदतीने प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन करावे.

४. **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-**

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला महानगरपालिका आयुक्त यांनी व्यापक प्रसिध्दी द्यावी. (परिच्छेद ६ प्रमाणे)

५. **प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे:-**

५.१ दिनांक १७/०६/२०२२ ते दिनांक २५/०६/२०२२ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल.

(i) लेखनिकांच्या काही चुका.

(ii) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले.

(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

५.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा करुन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या तयार करण्यात याव्यात.

६. परिच्छेद ३ प्रमाणे प्रारुप व परिच्छेद ५ प्रमाणे अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस महानगरपालिका आयुक्त यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

(अ) महानगरपालिका मुख्य कार्यालय, प्रभाग समितीचे कार्यालय व इतर कार्यालयातील सूचनाफलक.

(ब) स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दीची सूचना देऊन.

(क) स्थानिक केबल टि.व्ही.वर प्रसिध्दीची सूचना देऊन.

(ड) महानगरपालिकांचे संकेतस्थळ, इत्यादि.

७. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त व नोडल अधिकारी (उपायुक्त, निवडणूक) यांची राहील.

८. कोविड-१९ च्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने क्र. रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.०१/का.७, दि. १७ जानेवारी, २०२२ अन्वये सविस्तर आदेश दिलेले आहेत. त्यानुसार शासनाने / महानगरपालिकेने कोविड-१९ च्या अनुषंगाने वेळोवेळी जाहीर केलेल्या विविध उपाययोजना व दक्षता घेण्याबाबत दिलेल्या सूचनांचे योग्य पालन करावे.

९. आयोगाकडून देण्यात येणाऱ्या मतदार यादी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात आयोगाच्या नोडल अधिकारी (संगणकीकरण) यांच्याकडून आज्ञावली प्राप्त करुन घेण्यात यावी. यामध्ये काही तांत्रिक अडचणी असल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या संगणकीकरण कक्षामधील खालील दूरध्वनी
किंवा ई-मेलद्वारे त्यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.

दूरध्वनी क्रमांक - ०२२-२२८८६९५०/२२०२२९०९, Email - sec.mh@gov.in

१०. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. जिल्हाधिकारी, बृहन्मुंबई (शहर व उपनगर), ठाणे, पालघर, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, अकोला, अमरावती, व नागपूर.
५. सहायक आयुक्त (जनसंपर्क), राज्य निवडणूक आयोग
६. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
७. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
८. निवड नस्ती (कार्या.५), राज्य निवडणूक आयोग.

3315

सहपत्र - १

# मतदार यादी विभाजन कार्यपध्दती

मा.राज्य निवडणूक आयोगाकडून देण्यात येणाऱ्या मतदार यादी कार्यक्रमानुसार मतदार यादी संगणकप्रणालीमार्फत ( URL - ११५.१२४.९६.१२७ ) विभाजीत करतेवेळी खालील बाबींची काळजी घ्यावी....

- मतदार यादी ( Mother Roll ) प्राप्त करून घेणे

१) महानगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या सर्व विधान सभा मतदार संघ व त्यातील यादी भाग क्रमांक आयोगास कळविण्यात यावेत. सदर माहिती केवळ Unicode मध्ये देण्यात यावी. यादी भाग नमूद करताना १ ते ५ असे न करता १,२,३,४,५ असे नमूद करावे.

२) आयोगाकडून प्राप्त User ID व Password चा वापर करून Election Assemble Master भरण्यात यावे.

| Ward_Number | Ward_Name | Ward_Name_Marathi |
|---|---|---|
| | | |
| | | |

३) तद्नंतर आयोगाकडून प्राप्त सुचनानुसार "Mother Roll" Download करून घ्यावा. Mother Roll आवश्यक तेवढ्या यादी भागांचाच ( Part Number) Download करावा मात्र महानगरपालिका क्षेत्रातील कोणतेही मतदार वगळले जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

- कंट्रोल चार्ट तयार करून अपलोड करणे व प्रारूप मतदार ( Draft Voter List ) यादी तयार करणे

१) प्राप्त Mother Roll नुसार प्रारूप मतदार यादीसाठीचा कंट्रोल चार्ट तयार करावा. यासाठीचे Template Download करावा. खालील दिलेल्या कंट्रोल चार्ट Template मध्ये काळजीपुर्वक माहिती भरावी.

| AcNo | PartNo | Srno_From | Srno_To | Ward Number |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

फक्त आकडे भरावेत, कोणतेही Special Characters (,.":..@#)असे टाकू नयेत. Serial ब्रेक करू नये. Serial मध्ये लागू नसणाऱ्या मतदारांना ९९९ हा Ward Number द्यावा. कंट्रोल चार्ट

P.T.O.

अपलोड केल्यानंतर येणाऱ्या मेसेज प्रमाणे कंट्रोल चार्ट मध्ये काही त्रुटी असल्यास त्याचे निरसन करावे.

२) कंट्रोल चार्ट प्रोसेस केल्यावर १००% Process Complete झालेनंतर Draft यादी Download करून प्रिंट करावी. त्यानंतर ती प्रसिध्द करावी.

- **हरकती सुचनांवर करावयाची कार्यवाही**

  प्रारूप मतदार यादी वर येणाऱ्या Objections नुसार दुरुस्तीसाठी Objection Control Chart तयार करावा व तो अपलोड करून प्रासेस कराव्यात.

- **अंतिम मतदार यादी करणे**

  तद्‌नंतर अंतिम मतदार यादी प्रोसेस करून Download करून प्रिंट करावी.

- **मतदान केंद्र निहाय याद्या तयार करून व्होटर स्लिप जनरेट करणे**

  १) अंतिम मतदार यादी प्रसिध्द केल्यानंतर Polling Booth Master भरण्यात यावे व त्यानुसार Boothwise Voterlist Process करावी.

  २) Boothwise Voterlist Process केल्यानंतर A३ पेपर साईझमध्ये (Voterslips), A४ पेपर साईझमध्ये ( Boothwise Voterlist ) Generate होतील ती Download करून प्रिंट करावी.

निवडणूक प्राथम्य

माहे जुलै २०२२ ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हापरिषदा व पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/पोटनिवडणुकांसाठी दिनांक ३१/०५/२०२२ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी गाह्य धरण्याबाबत

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र. ०४/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०२/०६/२०२२

## आदेश

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) च्या कलम१९(१) (ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्र.५९)मधील कलम ७ (अ), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा.५) च्या कलम १३ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १२ चे पोट-कलम(१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, **दिनांक ३१ मे २०२२ रोजी अस्तित्वात असलेली** महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी, माहे जुलै २०२२ ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/ पोट निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

(किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र